# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/12/2022 (शनिवार) सकाळ

---

## दरोडा

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मुनबग्ज हॉटेल, मौजा गोडखैरी येथे दिनांक ०२/१२/२०२२ चे ०९.३० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— सुधीर तेजप्रताप सिंह, वय ३२ वर्ष, रा. प्लॉट नं ३०१, सुरक्षा नगर दत्तवाडी नागपुर हा मुनबग्स हॉटेलचे मालक नामे— कुशवंत बजाज, रा. नागपुर यांचे हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणुन काम करीत असुन सदर हॉटेलची जागा ही किरायाने घेतलेली आहे व यातील हॉटेल मालक व आरोपी क्र. १) शबनम विश्वनाथ ठाकुर (मालकीन) यांचेमध्ये नमुद हॉटेलच्या जागेवरुन वाद सुरु होते. याच कारणावरून नमुद आरोपी क्र. २) भिमसिंग बिसेन सिंग, ३) प्रदीप नेतराम शर्मा, ४) दलजीत सागर सिंग, ५) प्रतीक मनोहर कुबडे, ६) दिपक नेत्राम शर्मा, ७) जुबेर इस्तेशाक खान, ८) अजरूद्दीन शेरमोहम्मद खान, ९) जैनुद्दीन जमालुद्दीन खान, १०) भागचंद्र मुन्शी खरे यांनी मुनबग्स हॉटेलचे आतमध्ये अनाधीकृतपणे प्रवेश करून, हॉटेलच्या सामानाची तोडफोड करीत असतांना फिर्यादीने त्यांना हॉटेलच्या सामानाची तोडफोड करू नका व सामान चोरी करून घेवुन जाण्यास अटकाव केला असता त्यांनी फिर्यादीस अडवुन ठेवुन जिवे मारण्याची धमकी दिली. व हॉटेलमधील सेटअपच्या सामानाची तोडफोड करीत डिव्हीआर मशीन—१ आणि सिसिटीव्ही कॅमेरे—१२ किंमती अंदाजे ३०,०००/—रू., टेबल—२० किंमती ५०,०००/—रू., खुर्ची—३० किंमती ५,०००/—रू., टिव्ही—१ किंमती १५,०००/—रू., फ्रिज—२ किंमती ३५,०००/—रू., चुले—४ किंमती ६०,०००/—रू., शेगडी—४ किंमती ३०,०००/—रू. सिलेंडर—४ किंमती २०,०००/—रू., इन्वेर्टर—२ किंमती १८,०००/—रू., पाण्याची मोटार किंमती ५,०००/—रूपये, म्युझिक सिस्टम किंमती ३,०००/—रू. ईत्यादी असा एकुण किंमती २,७१,०००/—रूपयाचे साहीत्य व बंद डिफ्रिजर मध्ये नगदी अंदाजे १०,०००/—रूपयासह आरोपीतांनी जबरदस्तीने ट्रकमध्ये भरले. असा एकुण २,८१,०००/—रूपयाचा मुद्देमाल हॉटेल मधील साहीत्य हे जबरदस्तीने ट्रकमध्ये भरुन घेवुन जातांना मिळुन आल्याने कळमेश्वर पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन त्यांची वाहने थांबवुन आरोपीतांच्या ताब्यातुन असा एकुण २,८१,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५०, ३९५,४२७, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. २) ते १०) यांना अटक करण्यात आली असुन आरोपी क्र. १) याचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज खडसे पोस्टे कळमेश्वर मो. नं. ९४२१०५०३७० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर